# …लेलीं फुलें.

माधव.

२

किंमत सहा आणे.

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणे.



बनी-अंबूचा काका.

# फेंकलेलीं फुलें !

लेखक,

**माधव.** [ माधव केशव काटदरे. ]

REFBK-0019490

प्रकाशक—

**बाळकृष्ण रावजी पालवणकर,**

संपादक—**खेळगडी.**

ग्रंथ संग्रहालय
नं.

मित्रवर्य रा. रा.

**यशवंत सखाराम जोशी,**

यांस

प्रेमादर पुरःसर

**समर्पण.**

माधव

मुद्रक—मंगेश नारायण कुळकर्णी,
कर्नाटक छापखाना.
४३४ ठाकुरद्वार, मुंबई.

प्रकाशक—
बाळकृष्ण रावजी पालवणकर,
संपादक—खेळगडी.
मुगभाट ६७ गिरगांव–मुंबई

ग्रंथ संग्रह
क्रांक २८९

# फेंकलेलीं फुलें !

शैलाच्या शिखरावरी उगवलें जें रोपडें रानटी,
उद्यानांतिल वल्लरींसम सुमें येणें न त्या गोमटीं;
देतों सौरभहीन हीं परि फुलें फेंकून वाऱ्यावरी,
कोठेंही पडतांच लोचनसुखा देतील कोणा तरी !

माधव.

# अनुक्रमणिका.


उपोद्घात. ... ... ... ... ... १
१ ये ! ये ! ये राजा ! ... ... ... २
२ कोण बाळ हा फिरे वनीं ? ... ... ... ३
३ जगांत मोहकता कां आली ? ... ... ४
४ गमे मजला हें नवल यमूबाई ! ... ... ५
५ नको जाऊं बाहेर आज बाळा ! * ... ... ६
६ प्रिय जन जरि कोणी सोडुनी दूर गेला. ... ८
७ कृष्ण पक्षांतील एक वादळी रात्र. ... ... ९
८ प्रभात-काल आणि सूर्योदय. ... ... १०
९ समुद्रतीर. ... ... ... ... १२
१० कै. कविश्रेष्ठ ' विनायक ' यांस:— ... ... १४
११ बा भारता ! ... ... ... ... १६
१२ सूतमहं जातुचिन्न वरयामि ! ... ... १९
१३ शिवराजस्तव. ... ... ... ... २१
१४ कोठें हा हैदर अल्ली ! ... ... ... २२
१५ महादेव शर्म्यांचा मृत्यु ! ... ... ... २४
१६ अस्तंगत चंद्रमा ! ... ... ... २८
१७ कोणालाही परि विसरला तो न देवाधिदेव ! ... २९
१८ दिवे आणि आरसे. ... ... ... २९
१९ इशारत. ... ... ... ... ३०
२० प्रथम दर्शन. ... ... ... ... ३१

२१ कला तव कळुनि मला ये पुरी ! * ... ... ३२
२२ याचना. * ... ... ... ... ३३
२३ एकच घोट. ... .. ... ... ३४
२४ पारिजातकाच्या कळया. ... ... ... ३५
२५ करो हें माझेंही अमरचि तसें गान तुजला ! ... ३५
२६ तैसाच निघोनी जाई ! * ... ... ... ३६
२७ कसा कुसुमा त्या तनुस्पर्श व्हावा ? * ... ३७
२८ संपवीन अपुलें गाणें ! * ... ... ... ३७
२९ बरें तर ! संपीव ! * ... ... ... ३८
३० समुद्र आणि कवि. ... ... ... ३९
उपसंहार. ... ... ... ... ४०

---

**टीप**—ज्या पद्यांवर * अशी खूण आहे तीं पद्यें वंगकविश्रेष्ठ रवींद्रनाथ टागोर यांच्या कवितांच्या आधारानें लिहिलेलीं आहेत. हीं आपल्या इतर पद्यांबरोबर छापून प्रसिद्ध करण्याला खुद्द टागोरबाबू व त्यांच्या कवितेचे प्रकाशक मे. मॅकमिलन कंपनी ( लंडन ) यांनीं मला परवानगी दिली याजबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. —**माधव.**

# उपोद्घात.

चिरंजीव कु. **बनुबाई जोशी**, हीस.

तूं उषा हांसरी हांसत हांसत येसी,
स्व-प्रसन्न-हास्यें प्रसन्नता उधळीसी !
हांसुनी, आपणासवें जगा हंसवावें,
यावांचुनि तुजला अन्य न कांहीं ठावें !

तर अशीच हंसरे ! हांस !—सर्वदा;
हास्याची वितर जगास—संपदा !
पावो न हास्य विलयास—हें कदा !

हास्येंच तुझ्या या, प्रवृत्ति जागी झाली !
हास्येंच तुझ्या, मम हृदयीं गीतें फुललीं ! !

तुझा—
" काका "

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

सं. क्रमांक ८८८

# ये ! ये ! ये राजा !

ये ! ये ! ये राजा !-दे भेटी—जीव झुरे तुजसाठीं,
राजस हातांनीं—मार मिठी—दृढतर माझ्या कंठीं !
मोत्यें अश्रूंचीं—तुजवरुनी—काढिन ओंवाळोनी !
रम्य तुझें रूप—फिरफिरुनी—पाहिन डोळे भरुनी !
मम सुखशांतीचें—अभिराम—तूंच सख्या प्रिय धाम,
पावे तुजपाशीं—विश्राम—माझा आत्माराम !
इंदीवरतुल्य—नेत्रांनीं—अवलोकीं ही अवनी,
एकचि दृक्पातें—पहा क्षणीं—जाइल कैशी फुलुनी !
मंजुळ तव हास्यें—प्रसन्नता—येइल साऱ्या जगता !
मधुर तुझें गीत—कोमलता—शिकविल कठोर चित्ता !
पळेल नैराश्य—ऐकून—स्फूर्तिप्रद तव गान,
शाहिर सृष्टीचे—पक्षिगण—जातिल वेडावून !
वाजवुनी पांवा—भारून—टाकूं या हें भुवन !
पडातिल कृष्ण घन—कोसळुन—सुटुनी सारें भान !
डोलत राहील—निजदृष्टी—मिटुनी मोदें सृष्टी !
ये ! ये ! ये राजा—दे भेटी—जीव झुरे तुजसाठीं.

## कोण बाळ हा फिरे वनीं ?

फूलपांखरावरि बसुनी
कोण बाळ हा फिरे वनीं ?
कोणाचा हा मधु ध्वनी
स्फुरण भरी वातावरणीं ?
कोणाच्या मंजुळ गानीं
स्वर्गसुधा लाधे अवनी ?
तरुवर जे गेले वठुनी
पल्लव त्यां दिधले कोणीं ?
कुणीं नटविली कुसुमांनीं
ही लतिका-कुंजश्रेणी ?
विखरुनि मोत्यें मृदुल तृणीं
कोण बाळ हा फिरे वनीं ?

* * *

तेजस्वी तारापंक्ति,
नृत्य करी ज्याच्यावरतीं,
सरोवरीं त्या क्रीडेची
इंदुकला नौका याची !
करुनि तरंगा हिंदोल
घे झोंके चिमणा बाळ !
चित्रें दावुनि नित्य नवीं
रिझवी या संध्यादेवी !
गाउनियां याला गाणीं
मधुपाची निजवी राणी !
सांगा तर मजला कोणी
कोण बाळ हा फिरे वनीं ?

## जगांत मोहकता कां आली ?

हा देइ मुलामा बावनकशि सोन्याला,
हा विलास शिकवी सत्कविच्या कवितेला !
हा चंपकसुमनावरि अत्तर ओतून,
चढवितो सफेता जातिसुमालागून !
दहिंवरें उषा जी प्रभातकालीं न्हाली,
खुलवितो कपोलीं हाच तियेच्या लाली !
कल्लोलमालिका उदधिवरी करि नाच,
हंसवितो गुदगुल्या करुनि तियेला हाच !
फिरविता कुंचली हा न जरी रंगाची,
वार्ताहि न येती श्रवणिं इंद्र-चापाची !
　　अज्ञेय आणखीं ज्ञेय--ज्या स्थलीं,
　　मिळुनियां एकमेकांत—राहिलीं,
　　बैसुनियां आनंदानें—त्या स्थलीं,
हा जादु जगावरि पसरी फुंकुनि मुरली !
तेणेंच जगीं या मोहकता उद्भवली !!

# गमे मजला हें नवल यमूबाई !

चिं० कु० **यमुबाई पालवणकर,** हीसः—

ओठ घडले तव जणूं माणकांचे,
हंसें गालावर गोड तुझ्या नाचे !
कळी फुलती नव पारिजातकाची,
तशी मूर्ती चिमुकली तुझी साची ! १

चमक नयनीं जरि नसे तारकांची,
मुग्ध मोदाची वसति तरि सदाची;
चंद्रलेखेची चारुता तुझ्यांत,
तुझें दर्शन आल्हाद जना देत ! २

असासि बाळे ! तूं वयें जरी सान,
तरिहि जिज्ञासा आणि समाधान;
कशीं नांदति एकत्र तुझ्या ठायीं,
गमे मजला हें नवल यमूबाई ! ३

# नको जाऊं बाहेर आज बाळा !

नभा आच्छादित करी मेघमाला;
तिमिर दाटुनियां वनीं राहियेला;
होति जर्जर बहु तालवृक्ष सारे
जवन पवनाशीं झुंजतां बिचारे ! १

पंख पर्जन्यें भिजुनि मलिन झाले,
स्तब्ध चिंचेवरि काक बैसलेले !
नदीनिर्जनतट भीति दे मनाला,
नको जाऊं बाहेर आज बाळा ! २

वईपाशीं बांधुनी ठेविलेली,
गाय कपिला बापुडी भिजुनि गेली !
तिला बांधुनि गोठ्यांत परत येतं,
बसुनि बाळा तोंवरी रहा येथें ३

जागजागीं शेतांत भरे पाणी,
धरिति मासे जाउनी तिथें कोणी !
गल्लिगल्लींतुनि करित खळखळाटा
गढुळ पाणी बुझवितें सर्व वाटा ! ४

करुनि घोडा आपुला समीराला,
स्वार त्याच्यावरि मेघ गमे झाला !
नदीवरुनी घागरी आपुलाल्या
कधिंच भरुनी बायका परत आल्या ! ५

तऱ्यालागीं हा कोण हांक मारी ?
बंद तरिची जाहली असे फेरी !
असे आला सरितेस महापूर
ऐक बाळा गर्जना तिची घोर ! ६

काव्य

दिवे अझुनी आहेत पुसायाचे,
सांज झाली तरि न तें कळायाचें !
जागजागीं मार्गांत चिखल झाला,
नको जाऊं बाहेर आज बाळा ! ७

वाघ सांपडतां पिंजऱ्यांत जैसा,
वनीं वेळूंच्या वायु आज तैसा,
क्षुब्ध होउनि धडपडे सुटायाला
शब्द त्याचा दे भीति बालकांला. ८

---

## प्रिय जन जरि कोणी सोडुनी दूर गेला—

प्रिय जन जरि कोणी सोडुनी दूर गेला,
रिपु न कधिं शके तें आप्त चिंती तयाला !
मन विविध कुतर्कीं गर्क होऊन जाई,
भयद अमित चित्रें कल्पनाचक्षु पाही ! १

क्षणभरि जरि आशा तीच वाटे दुराशा,
क्षणिंच मग तियेचें स्थान घेई निराशा ?
सुमसम हृदयींचा तों गळे सर्व धीर,
खळ खळ खळ वाहे लोचनांतून नीर. २

पुनरपि उदया ये त्या निराशेंत आशा !
तरि मनुज-मनींची मावळेना निराशा !
बल न जरि कराया दारुण-ध्वान्त-नाश,
सुखद तरि समस्तां होय शुक्र—प्रकाश. ३

# कृष्णपक्षांतील एक वादळी रात्र.

अस्तासि जाय दिननायक अंशुमाली,
ध्वांतार्णवांत वसुधा अवघी बुडाली !
सृष्टि-स्वरूपहि भयानक होय सारें,
' सों सों ' करीत सुटले बहु गार वारे. १
फेरुध्वनी निघति निर्जन काननांत,
ये पूर्ण निर्भयपणा रजनींचरांत !
वृक्षांवरी लटकतां दिन जाय ज्यांचा,
त्या संप्रती सुळसुळाटहि वाघुळांचा ! २
शाखां किती पवन भग्न करी तरूंच्या,
चाले सदा ' कर कर ' स्वर कीचकांचा;
अंभोधिही खळबळे सुटतांच वात,
यती वरी जलचरें भयभीतचित्त ! ३
देवींस यत्न असुरें धरण्या करावा,
त्याही तयास भिउनी पुढतीं पळाव्या;
साधूनि संधि निमिषांत अदृश्य व्हाव्या,
तों क्षुब्ध दैत्य अधिकाधिक होत जावा, ४
तैशी सलील करुनी कृति दाखवीती,
तीरावरी पवन आणिक फेनपंक्ति !
सक्रोध तुंग लहरी उसळून येती,
ओढावया, गगन भूवरि, पाहताती ! ५
जातां फुटून जलदासम गर्जतात,
किंचित् प्रकाश हिरवा विलसे तयांत !
कोठें कडेहि तुटले धरणीधरांचे
आघात तीव्र बसतांच महार्णवाचे ! ६
उध्वस्त वायु करितो कदलीवनांना;
आला गमे प्रलयकालचि कोमलांना !
झालीं समस्त मृदु-पुष्पदलें विशीर्ण,
गेल्या लता सकल होउनि छिन्नभिन्न ! ७

# प्रभातकाल आणि सूर्योदय.

तिमिर विरल होई, होय जों जों प्रभात,
विरल विरल तारा राहती अंबरांत;
उदय अरुण पावे, सुप्ति आलस्य दैन्य
सजति सकल जाया रात्रिसंगें निघून. १

उठवित जन सारे आजपर्यंत आली,
उठविल पुढच्यांना व्हावया भाग्यशाली;
उठुनि परि करावें आजच्यानींहि कांहीं
ह्मणुनि नभिं विराजे देवता ती उषाही ! २

नयनसुखद तैसें धाम जें मंगलांचें,
अनुपम सुषमा दे तेज पूर्वे तियेचें;
हळु हळु हळु वस्तू दृश्य एकेक होई,
हळु हळु हळु लोकीं संचरे चेतनाही, ३

तरुवरि मधुगीतें गातसे पक्षिवृन्द
दरवळुनि दिशांना राहतो पुष्पगन्ध;
झुळुक मधुनि येई शीत मंदानिलाची,
करिति मृदु रवाला सौम्य-वारांशि-वीचि ! ४

हळु हळु हळु लोपे सर्व नक्षत्रमाला,
द्युति अखिलहि आतां व्यापिते अन्तराला;
लपुनि तिमिर बैसे कन्दरामाजि खोल,
सभय बघत मागें जाय रानीं श्रृगाल ! ५

रसचि पसरला हा तप्त चामीकराचा[1] !
किरणनिकर ऐसा येत पूर्वेस साचा;
हळु हळु हळु सारा रक्तिमा नष्ट झाला,
शिरिं उदयगिरीच्या बालमार्तण्ड आला. ६

करि रजतरसाच्या स्नान गंगाप्रवाहीं,
ह्मणुनिच जणुं लाधे शुभ्रता दिव्यताही !
सपदि दिनकराच्या रंगली रश्मिमाजी
लघु लघु जलदांची अंबरीं रम्य राजि ! ७

वितरुनि शुचि तेजा नाशिला अंधकार,
उचिताचि म्हणुनीयां सृष्टि हर्षे अपार,
हळ हळ परि वाटे मन्मनीं भानुराया !
झटति कर तुझे रे ! रुद्ध दृष्टी कराया ! ! ८

काव्य नं. ५८८

---

१ सोन्याचा.

# समुद्र—तीर.

कोठें भक्षित धूर्त काक बसती श्वेतांग कर्काप्रति,
कोठें गौर असे तरंगति जलीं मत्स्याद पक्षी किती !
अंगें पर्वततुल्यशा जलचरी च्याल्या कुठें सागरीं,
त्यांच्या आणुनि टाकितात लहरी वारी किनाऱ्यावरी. १

शुक्तीच्याच अभेद्य दिव्य कवचा जे जन्मतां लाधले,
ऐसे जीव लपूनि आर्द्र-पुलिन-प्रांतीं कुठें राहिले;
येतां ऊर्मि सवेग धांवत पुढें, बाहेर त्यां काढिती,
ल्यालेले कवचांस ते, परि उडे त्रेधा तयांची अति ! २

शिंपा, शंख, तशा कितीक कवड्या तीरीं कुठें शोभती,
कोठें तच्छकलेंच तीं विखरलीं होऊन नानाकृति;
कोठें जाउनियां लया धवलता कृष्णत्व ये सैकतीं,
वारिस्रोतहि वालुकेंतुनि कुठें सिंधूकडे धांवती. ३

कोठें तुंग विशालसे विलसती रेतींत पाषाण ते,
बैसे निश्चल यूथ कृष्ण कपिंचा ऐसें मना वाटतें !
कोठें रम्य शिलातलीं जल दिसे शेवाळलें सांचुनी,
कोठें शब्द करी समीर शिरतां पाषाण—रंध्रांतुनी ! ४

न प्राणी, नच ओषधीहि म्हणवे ! ऐशी जयांची स्थिति,
दोहींचे गुण लाधुनी उभयही कोटींस ज्या सांधिती,
पाषाणास धरून राहति जलीं, स्पर्शेंच संकोचती !
त्या पद्माकृति राजसा किति शिलागतीं कुठें राजती. ५

---

१ यांना Zoophytes म्हणजे 'प्राण्योषधी' असें म्हणतात.

कोठें ऊर्मिस वायु जर्जर दृषत्खंडीं करी लोटुनी,
कोठें पर्वतगव्हरीं घुमविती वीचि स्व-मंद्र-ध्वनि !
शोभा अंबुकणांस इंद्रधनुची सूर्यप्रकाशांत ये,
कल्लोलांसह झुंजतां अनिल जे व्योमीं पळाले भयें ! ६

सन्मित्रद्वय जेविं दुर्जनगणें, वा मृत्युनें दंपती,
केले भिन्न झटूनि नीरनिधिनें पाषाण तेवीं किती !
चिन्हें तच्छकलांवरील जरि तत्पूर्वैकता दाविती,
आतां येइल कोठुनी परि पुन्हा त्यां एकरूपस्थिति ? ७

ज्या ज्या वस्तु चकाकतात, असत्या त्या त्या जरी कांचन;
किंवा सद्वचनासमान असतें सोपेंच सद्वर्तन;
तें पूर्णत्व, चिरंतनत्वहि तसें येथें जरी नांदतें;
कां मिथ्या तुजला जगा ! मग तरी तत्त्वज्ञ बा ! बोलते ? ८

## कै. कविश्रेष्ठ 'विनायक[1]' यांसः—

सोडुनि जळत्या उच्छ्वासांना,
जाळिल दूषित वातावरणा;
कोण तुझ्याविण रे ! कविराणा ?
　　सुकविनायका ! कवि-विनायका ! १

तूं राष्ट्राचा शाहिर खंदा,
तूं राष्ट्रीयत्वाचा बंदा,
परवशतेच्या तोडिसि बंधां !
　　सुकविनायका ! कवि-विनायका ! २

परंपरा जी शाहीरांची
अखंड पुढतीं चालायाची
प्रेरक तिज तव गीतें साचीं !
　　सुकविनायका ! कवि-विनायका ! ३

मनही ज्यांचें दास परांचें !
ध्वनी तयांना तव गीतांचे,
क्षणांत करितिल धनी मनाचे !
　　सुकविनायका ! कवि–विनायका ! ४

जातिवंत तव जिवंत वाणी
दगडांचेंही करुनी पाणी !
दरीदरींतुनि राहिल घुमुनी !
　　सुकविनायका ! कवि-विनायका ! ५

---

१ विनायक जनार्दन करंदीकर. जन्म, इ. स. १८७२ मृत्यु इ. स. १९०९

राष्ट्र-द्रोहा खाक करोनी
राष्ट्र-हृदीं ऊर्जस्वल[2] गाणीं
नाचायाचीं तुझीं निशिदिनीं !
सुकविनायका ! कवि-विनायका ! ६

जड नीरस ही माझी वाणी !
गाउं कसा मी तुजवरि गाणीं ?
बोल शुष्क हे घे मानोनी !
सुकविनायका ! कवि-विनायका ! ७

---

२ जोरदार.

## बा भारता !

भारता ! तुझी असली ही—दुर्दशा कशानें झाली ?
*गडगंज तुझी संपत्ति—लुटुनियां कुणीं रे नेली ?
ही मृत्युमुखीं शिरण्याची—अवदसा कुणा आठवली ?
कोण हे दरोडेखोर
जीवावर होति उदार ?
अन्यापारीं व्यापार
यन्मती कराया धजली ! १

एकदां झडत होता ना—दुंदुभि तव दिव्य यशाचा ?
एकदां होत होता ना—विजयनाद तव वीरांचा ?
संचार जलधिवरि तैसा—तव नौकानयनज्ञांचा ?
सिंधूचें हिरवें पाणी
हंसविलें प्रथम वद कोणीं
गुदगुल्या तयाला करुनी ?
स्थिति कशी लया ती गेली ? २

जाळाया अपुलें पोट—हरिलें न अन्न अन्यांचें,
तुडविलें न पायाखालीं—स्वातंत्र्य कुणा राष्ट्राचें !
धर्मवेड शिरुनी अंगीं—काढिलें न रक्त कुणाचें !
चिंतनीं मग्न राहून
सीमेला तत्त्वज्ञान
जो ठेवितसे नेऊन
त्या विपदा तुज कां आली ? ३

---

* हिंदुस्तानावर वायव्येकडून वेळोवेळीं ज्या स्वाऱ्या झाल्या व ज्यांत हिंदुस्तानची अपरंपार संपत्ति लुटून नेण्यांत आली त्यांना अनुलक्षून हे उद्गार आहेत. हिंदुस्तानची अशी लूट ज्यांनीं केली त्या लोकांचीं राष्ट्रें आजला मेलेलीं अगर मरत घातलेलीं आहेत.

लाधतां तुझे धनकोश—गिझनीच्या सुलतानांना,
तव संपत्तीची सुटली—मनिं हांव इराणतुराणां !
राहिलास निद्रा घेत—फावलें म्हणुनि चोरांना !
घातकी सुप्ति टाकोनी
चल, ऊठ कमर बांधोनी !
घे ध्येया प्राप्त करोनी !
जगदीश असे तव वाली ! ४

चालला अमानुष ज्यांचा-जगतांत आज धुडगूस,
दुबळ्यांना भक्षायाचा-ज्यां रात्रंदिन हव्यास,
तडफडुनि उद्यां मरताना-बघशील भारता ! त्यांस.
त्वां राष्ट्रांचे उदयास्त
पाहिले किति न त्यां अंत
बघशील पुढेंहि अनंत
शिथिलता झाड परि अपुली ५

नागविलें तुजला ज्यांनीं-किति राष्ट्रं त्यांतिल मेलीं !
आणिक जीं उरलींसुरलीं-आसन्नमरण तीं झालीं !
आतां तुज गांजायाला-कोणाची माय न व्याली !
उद्योगशील होवोनी
घे उन्नति अपुली करुनी
करि यत्न तयालागोनी
यश कार्यी दे वनमाली ! ६

प्रगतिचें तुझ्या पाऊल-या पुढतीं न पडो मंद !
उदधीच्या वक्षावरतीं-पुनरपि तव नौकावृंद
लोळुनी स्वैर संचार-जगभरी करो सानंद !
वरि लक्ष्मी चंचलतेस
तरि वाणिज्यीं तद्वास,
धर ह्मणुनि तयाची कास
कीं लक्ष्मी तुज अनुसरली ! ७

सिंधूच्या स्वामित्वानें–व्यापार हस्तगत होई,
व्यापार हस्तगत होतां—लक्ष्मी वश होउनि राही,
जगतांतिल लक्ष्मी हातीं—स्वामिच तो जगताचाही !
तत्त्व हें जयांना कळलें,
कळुनिही जयांना वळलें,
शास्ते तव तेचि जहाले,
तद्विद्या कर तूं अपुली ! ८

कर्तव्य भविष्यत्कालीं—तुजलागीं आहे एक,
बा ! तमोगुणाचा झाला—संप्रती जगीं अतिरेक !
जग सत्त्वगुणाची तुजशीं—मागाया येइल भीक !
त्या शिक्षा सात्त्विकतेची,
दे समाधानवृत्तीची !
शांतीच्या साम्राज्याची
स्थापना जवळ मग आली ! ९

जातीच्या शाहीराला—स्फुरणें न गान निर्जीव !
भारता ! तुझ्या भाग्याचें—फुलणार रम्य राजीव !
परतणार भारतलक्ष्मी—चुकला हें बोलुनि देव !
तूं देवाचा प्रिय भक्त
वांचणार काल अनंत !
तुजलागीं नाहीं अंत !
होशिल तूं वैभवशाली ! १०

---

१ हें तत्त्व सर वॉल्टर रालेच्या 'जगाचा इतिहास' या ग्रंथांत दिलेलें असून ब्रिटिशांनीं त्याचा व्यवहारांत उपयोग करून दाखविला आहे व सुदैवानें हिंदुस्तानाला तेच शास्ते लाभले आहेत.

# " सूतमहं जातुचिन्न वरयामि ! "

[ द्रौपदी अर्जुनाला द्यावयाची असा द्रुपद राजाचा बेत होता. पण पांडव जळून मेल्याची एकाएकीं बातमी आल्यामुळें त्याला तो बेत रहित करावा लागला. आतां द्रौपदीला पति पहावयाचा तो शस्त्रास्त्रविद्याप्रवीण तरी असावा असा विचार करून त्यानें मत्स्ययंत्राची योजना केली व त्याचा भेद करणारास द्रौपदी वरील असें जाहीर केलें. त्यावरून मी मी म्हणणाऱ्या अनेक राजांनीं व राजपुत्रांनीं मत्स्ययंत्र भेदण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ ! शेवटीं दुर्योधनाचा मित्र अंगराज कर्ण हा पुढें सरसावला. तो सूतपुत्र आहे असें कळतांच द्रौपदी संतप्त होऊन आपला बंधु धृष्टद्युम्न यास म्हणते:— ]

" धृष्टद्युम्ना ! बघत बससी दीनसा काय आज ?
" क्षत्रत्वाची तिळहि तुजला काय नाहींच लाज ?
" सूताचा हा सुत उचलुनी चाप त्या बाण लावी !
" भार्या याची द्रुपदतनया त्वत्स्वसा काय व्हावी ? १
" दे फेंकोनी सदसि अपुला, कंकणें घाल हातीं !
" घे नारींचीं, त्यजुनि कवचा, भूषणें योग्य तीं तीं !
" पांचाळांची हरण करुनी सूत ने राजकन्या,
" वाटे चित्तीं म्हणुनि तुजला धन्यता काय धन्या ? २
" कोण्या नीतिच्युत युवतिनें आचरीलें कुकर्म,
" त्या पापाचें प्रकट फल हा पावला पोर जन्म !
" मत्प्राप्तीची धरुनि मनिं ये वासना हा कशाला ?
" प्राणांतींही वरितिल न बा ! राजकन्या अशाला ! ३
" ज्यांच्या याच्यासमचि जनि, ज्यां ठाउकें ना सुशील,
" किंवा ज्यांचें अधम कुल त्या याजला भाळतील !
" मुक्तामाला मृदुल नलिनीनाल भक्षावयाला,
" हंसी ऐशी वरिल बक कां सोडुनीयां मराला ? ४

१ जन्म.

" ' शस्त्रास्त्रीं हा कुशल ' वदसी, ' चित्त याचें उदार; '
" ' याशीं पार्थाविण न दुसरा संगरा ठाकणार. '
" दुर्दैवानें नरवर पृथापुत्र तो नष्ट झाला !
" धृष्टद्युम्ना म्हणुनि चढला काय रे ! माज याला ? ५

" नांवाचे हे सकल जमले काय ' राजाधिराज ' ?
" कोठें गेले प्रबलतर ते क्षत्रियांचे समाज ?
" झालें उर्वीतल अखिलही काय निर्वीर आज ?
" किंवा पार्थासहचि अवघें लोपलें क्षात्र तेज ? ६

" घोडेहांक्या हरण करुनी चालला क्षत्रकन्या !
" हा ! हा ! बाहू अझुनिहि कसा क्षत्रियांचा स्फुरेना ?
" कन्या न्याया धजति पर, त्यां शासितां येत नाहीं,
" शोभेना त्या पुरुषशशकां पौरुषाची बढाई. ७

" काढा आधीं करुनि अधमा अर्धचंद्र-प्रयोग !
" लावूं याच्या अतुल सुगुणां घेउनी काय आग ?
" लोहालागीं बुधजन शिरोधार्य मानील कोण ?
" संगें त्याच्या जरिहि असलें रत्न देदीप्यमान. ८

" ऐश्वर्याला भुलुनि अपुली उच्चता जी विमानी,
" पश्चात्तापा करित पुढतीं राहिली देवयानी;
" धृष्टद्युम्ना ! अचतुर तशी ही नव्हे याज्ञसेनी !
" शूरत्वाचा निधि तरिहि हा सूत दे हांकलोनी ! " ९

## शिवराजस्तव.

अभिन्न नृपते ! तुझें वचन आणखीं वर्तन,
ह्मणूनि रिपुही तुला करिति आदरें वंदन !
तुझें यश करीतसे पतित मानवां पावन,
तुझें चरित देतसे विगतचेतनां जीवन. १
घडेल तव राजया ! स्मरण नष्ट राष्ट्रीं जरी,
स्फुरेल तरि चित्कला खचित रोमरोमांतरीं !
समस्त जड वस्तुही करिल तेथली तांडव,
चराचर परस्परां गणिल आपुले बांधव. २
तुझ्या रणधुरंधरा ! नच जगीं तुळा कीर्तिला,
उदार तुजसारिखा कधिं न पाहिला, ऐकिला !
गभीरतरमानसा ! नयपटो ! दया-सागरा !
वदेल तुज सोडुनी कवण कोहिनूरा ' हिरा ' ? ३
स्वशत्रुरमणी गणी परम पूज्य मातेसम,
कधीं जित रिपूंसही अवगणी न जो सत्तम,
समस्त शरणागतां अभय दे उदाराग्रणी,
असा तुजविणें दुजा नृप न लाधली मेदिनी. ४
खराच अवतार तूं शिवनृपा ! शिवाचा जगीं,
कधींहि भगवद्गिरा नच ठरेल ती वाउगी.
प्रमत्त रिपु दंडुनी करुनि आर्यधर्मावन,
सुदुष्ट नर मारिले, सकल तारिले सज्जन. ५
तुझी स्मृति नरर्षभा ! स्मृति न ती, असे जागृती !
तिच्यासह सुखें सदा विजय नीति हीं नांदती !
सुनाम तव ऐकतां तनुंत होय संवेदना,
चढे रुधिरबिंदुना स्फुरण लाधुनी चेतना ! ६
धरूनि हृदयीं तुला, तव असे महाराष्ट्र हा !
' मरेन मरणें तरी तुजसि गात ' ही या स्पृहा !
असो तव शुभाशिची सतत यावरी पांखर,
प्रसन्न मग या सदा सहज ' कृष्ण योगेश्वर ' ! ७

[library stamp]

# कोठें हा हैदर अल्ली !

तो कुठें शिवाजीराजा,—कोठें हा हैदर अल्ली !
मंदारवृक्ष तो कोठें—ही कुठें विषारी वल्ली !
पावेल भोजभूपाचें—भाग्य काय भाग्या तेली ?
तुळितोसि सुधापात्राशीं—फुटकी ही केविं तपेली ?
नाचला कृष्ण गोपाल,
नाचती भूत-वेताल;
परि काय त्यांत बा ! मेळ ?
तव दृष्टी असली कसली ?—कोठें हा हैदर अल्ली ! १

जन्मतां शिवाजी सरजा—मेलेले मुडदे उठले !
चैतन्य रोमरोमांत—मृतराष्ट्राच्या संचरलें !
धिंगाणा घालित होतें—तें हयात मृतवत् झालें !
ये अचेतनांतहि वारें !
नगराज डोलले सारे !
उतरले भूवरी तारे !
शिव ऐसा वैभवशाली—कोठें हा हैदर अल्ली ! २

स्मरणेंच जयाच्या निमिषीं—स्फुरणाला स्फुरण चढावें !
जागृतिनें जागें व्हावें—धैर्यानें धैर्य धरावें !
भीतीला भय वाटावें—कर्तव्या कार्य कळावें !
तो दीनांचा कैवारी,
हा साधुजनांचा वैरी,
गांजितो तयांतें भारी,
दुष्टांचा झाला वाली—कोठें हा हैदर अल्ली ! ३

हतभागि रामराजाचें—शिर तोडुनियां यवनांनीं
वेशीवरि विजयपुराच्या—लाविलें मदोन्मत्तांनीं !
निष्प्राण तरी शिवबाच्या—तें नयनां आणी पाणी !

ग्रंथालय

अर्थ त्या नेत्रनीराचा,
तुज कोठुनि समजायाचा ?
लावुनी हिऱ्याशीं कांचा
करितोसी तुलना कसली—कोठें हा हैदर अली ? ४

ये कर्तव्याची हांक-पडसाद तियेचा उठला,
स्फुरवीत चेतना लोकीं-कंदरीं वनीं दुमदुमला !
शिवभूप मुल्क मैदान-हांकेला धांवत आला !
बलराम जसा यमुनेला,
शिववीर फिरवि काळाला !
शाहीर हवा गायाला
रायाची कीर्ती असली-कोठें हा हैदर अली ? ५

वाजतां शिवाचें शिंग-प्राणांतहि भरला प्राण !
भानावरि आलें भान-स्फूर्तीची चढति कमान !
तेजस्वी झालें तेज-नामर्दपणा निष्प्राण !
गिरिनिर्झर, निर्जन रान
होउनी वृत्ति उत्तान
नर्तनीं करीना न्यून !
शिव मृतां सुधामय वल्ली-कोठें हा हैदर अली ! ६

कामाला प्रेम ह्मणावें-प्रणयमूढ कविकीरानें
श्वा मघवा एके ओळी-बसवावे व्याकरणानें
' शिव हैदर तुल्य गुणांचे-बरळावें इतिहासानें !
परि विचार जागृत ज्याचा,
सामर्थ्ययुक्त यत्नाचा,
उद्गार निघेल तयाचाः-
" कोठें शिव सद्गुणशाली-कोठें हा हैदर अली !!" ७

---

# महादेव–शर्म्याचा मृत्यु !

[ महादेवशर्मा या नांवाचा एक जातिवंत कवि होता. त्याची पत्नी व पुत्र हीं मृत्युमुखीं पडल्यापासून त्याच्या चित्ताचा उल्लास पार नाहींसा होऊन तो खिन्न व एकांतवासप्रिय बनला होता. त्याच्या ह्या वर्तनामुळें शहाण्या जगाकडून त्याची पहिल्या प्रतीच्या वेड्यांत प्रामुख्यानें गणना होत होती. गांवचे गांवगुंड हरएक प्रकारें त्याचा छळ करून स्वतःला कृतकृत्य मानीत होते. अशाच एका गांवगुंडाच्या कृष्ण कृत्याला महादेव-शर्मा बळी पडला व एका काळोख्या रात्रीं सर्व सृष्टि वादळामुळें क्षुब्ध झाली असतांही शांतपणें मृत्यु पावला. खालील श्लोकांत त्यांचा अंत वर्णिला आहे. ]

वार्ता न त्या लव भयंकर वादळाची,
होते समीप बसले जन जे तयांची;
जों क्षुब्ध सृष्टि अधिकाधिक होत गेली,
तों शांतता अधिक तद्‍हृदयांत आली ! १

कापट्यपूर्ण जगता विटले बघून,
तच्चारुनेत्र गमतें मिटले म्हणून !
प्राणांसवें न सखिची प्रिय मूर्ति जावी,
वक्षीं जणो म्हणुनि दक्षिण हस्त ठेवी ! २

लीला अनेक दिसल्या हृदयेश्वरीच्या,
बाल्यांतल्या किति तशा किति यौवनींच्या;
तो एकदां बघतसे तिज रोहिणीतें
हिंदोलकीं बसुनि मंजुळ गीत गाते ! ३

येती पुढें कुरळ कुंतल जे उडून,
त्यांचें निवारण करें करिते मधून !
आघात भूवरि करी चरणारविंदें
हिंदोलका हलविते हंसुनी प्रमोदें. ४

पाहे पुनश्च तिजलागिं विवाहकालीं
लज्जाविनम्र परि उत्सुक फार झाली !
किंचित् सकंप मृदु हस्तयुगें सुशीला
अर्पी तयास हृदयासह पुष्पमाला ! ५

कार्यांत दक्ष, परि चोरुनि यास लक्षी
ऐशी अधोमुख पुन्हा दिसली मृगाक्षी;
दृष्टींत दृष्टि मिळतांच सलज्ज झाली,
तेणें छटा चमकली क्षणमात्र गालीं ! ६

होतां सती कुलवती करपाशबद्ध,
ती लाजलाजुनि बळें करिते निषेध !
यत्नें यदा पतिभुजांतुनि होय मुक्त,
वेगें पळे; परि मनीं अनुरागयुक्त ! ७

ते भ्रूविलासहि पुन्हा दिसले तयाला,
ऐके सुधामय तिच्या वचनावलीला;
तें प्रेम, तो विनय, ती शुचिता सखीची
ये प्रत्ययास तनुहुनी मृदुता मनाची ! ८

वाचूनि मोह तिचिया कवितेसि पावे,
चित्तांत आदर तिच्याविषयीं दुणावे;
तादात्म्य वर्ण्य विषयीं, प्रतिभाहि दिव्य,
कोणासि मोहित असें न करील काव्य ? ९

झाला विनोद करितां रुसवा सखीचा,
मानीपणा कळुनि ये मग मानिनीचा !
ते चंद्रिकेंतिल विहारहि एकवार
त्याच्या पुनश्च घडले नयनांसमोर ! १०

कंठूनियां दिन युगांसम विप्रयोगीं
निस्तेज तेविं कृश होय सुकोमलांगी,
होतां सतीस पतिदर्शन ये उमाळा,
ती अश्रुनींच बघतो करि पूजनाला ! ११

सायान्हि ये परतुनी सदनासि नाथ,
मार्गाकडे निरखुनी म्हणुनी पहात !
जी वाम बाहुवरि वाम कपोल ठेवी
ऐशी समुत्सुक पुनश्च बघे स्वदेवी. १२

मंदत्व ये पुनरपी तिज गर्भभारें,
झाले असह्य मग कष्ट सतीस सारे !
पाहे पुन्हा तिजासि ने स्वगृहासि तात
हाही निरोप तिज दे अतिखिन्नचित्त ! १३

'झालें सखीस ' परिसे ' जरि पुत्ररत्न
ये क्षीणता बहु तिला हरले प्रयत्न !
आशा तदीय उरली तिळमात्र नाहीं
तीचा परंतु पतिदर्शनिं हेतु राही ! ' १४

पाहूनि यास सतिचें जरि चित्त धालें
याचें परी हृदय फाटुनि पूर्ण गेलें !
बाहेर तोंच तनुचा थरकांप झाला
निःश्वास एक अतिदीर्घ असा निघाला ! १५

घाली उगाळुनि, कुणी समयज्ञ, मात्रा,
चाले परंतु न तिची लवमात्र मात्रा !
जें आणणें घडवुनी प्रिय देवराया
तेथें नरा ! यश कसें तव ये उपायां ? १६

त्या लागला मरणसूचक थोर घोर,
गात्रावली पडत चाललि थंडगार !
यत्स्नेह सर्वहि असे विलयास गेला,
त्या दीपसाच जन तो गमतो मनाला ! १७

शुभ्र प्रकाश दिसला नयनांस अंतीं
शुभ्रांशुची बघुनि ज्या विरमेल कांति;
होता अपूर्व, गमला परि सौख्यधाम,
त्याची तिथें रमुनि जाय मति प्रकाम. १८

प्रेमप्रपूरित जिचें मन ती निमाली,
कालोदरांत सुहृदावलि लुप्त झाली;
त्यांवीण जें दिसतसे नयनां भयाण,
त्या एकलाच जगतांत वसेल कोण ? १९

स्पर्धा, अहंकृति, तिरस्कृति, कोप, रोष,
संताप तेविं दुसरेहि अनेक दोष,
देहासवेंच कलहप्रिय या जगांत
ठेवून तो धरितसे परलोक-पंथ ! २०

* * * *

भस्मावशेष शव होय जिथें तयाचें,
तेथेंच संप्रति शिवालय एक साचें.
त्याच्यापुढें करिति सांजसकाळ गान
बिल्वावरी बसुनि रम्य शकुंत तीन ! २१

प्रेमप्रपूरित जिचें मन ती निमाली,
कालोदरांत सुहृदावलि लुप्त झाली;
त्यांवीण जें दिसतसे नयनां भयाण,
त्या एकलाच जगतांत वसेल कोण ? १९

स्पर्धा, अहंकृति, तिरस्कृति, कोप, रोष,
संताप तेविं दुसरेहि अनेक दोष,
देहासवेंच कलहप्रिय या जगांत
ठेवून तो धरितसे परलोक-पंथ ! २०

* * * *

भस्मावशेष शव होय जिथें तयाचें,
तेथेंच संप्रति शिवालय एक साचें.
त्याच्यापुढें करिति सांजसकाळ गान
बिल्वावरी बसुनि रम्य शकुंत तीन ! २१

# अस्तंगत चंद्रमा !

( अन्योक्ति. )

कोणी स्वकार्यसाधू उदयोन्मुख दिनकरा करो नमन !
नेई परंतु माझें अस्तंगत चंद्रमा हरून मन ! १

देवोनि चंड तापा विश्वाचें राज्य चालवो सविता
न यशोगानीं त्याच्या रंगायाची कधीं सुकविकविता ! २

राज्य करी देहावरि, कविधिक्कारासि पात्र तो झाला,
हृदयाचा जो राजा, वाखाणिति जातिवंत कवि त्याला. ३

दे म्लान सृष्टिलागीं जीवन वृष्टी करोनि अमृताची,
त्या शांति-पुष्टि-तुष्टि-प्रद धन्यचि एक चंद्ररायाची ! ४

गेलाच चंद्रराजा ! मावळला मूर्तिमंत सौम्यपणा !
मेली दया ! कपाळीं आलें रडणें तुझ्या चकोरगणा ! ५

दातृत्व-शुचित्वाचा, क्षमागुणाचाहि जाहला अंत !
पडलें प्रसन्नतेचें लोळत अवनीतलावरी प्रेत ! ६

कोणास पाहुनी तूं आतां सोल्लास नृत्य करिशील ?
कोणा आलिंगाया झटशिल गंभीर सागरा ! बोल ! ७

कासारकुमुदवृंदा ! जाण विकासास पूर्ण मुकलास !
आतां सद्भाग्याची चित्तांतुनि टाक काढुनी आस. ८

घे दीर्घ योगनिद्रा ! उदरीं धारण करोनि अलिमाला,
गातील आंतुनी त्या चंद्रावरि शोकपूर्ण गीतांला ! ९

मीही अश्रुजलाच्या मोत्यांची लेववीन तुज जाळी !
लाव समाधी बापा ! भंग नसो तिजसि कोणत्या काळीं ! १०

स्वार्थी जगतें इकडे जन्मा येतिल, मरूनि जातील !
तुच्छत्वानें त्यांना कासारोदक-तरंग हंसतील ! ! ११

## कोणालाही परि विसरला तो न देवाधिदेव !

अंधा ! स्तंभासम जरि तुवां मानियेलें गजास;
काकत्वाला बधिर मनुजा ! त्वां दिलें कोकिलास
धिक्कारीलें जरि मधुकरा ! चंपकाच्या कळीला;
तुच्छत्वें त्वां जरि उडविली कुक्कुटा ! रत्नमाला; १

पावे जेव्हां उदय रजनीकांत तो कांतिशाली,
कूपा ! तूतें जरि न भरती तेधवां लेश आली;
गेल्या रानीं निघुनि अथवा ज्या विभूति श्मशानीं,
प्रेमें त्यांच्यावरि जरि जगा ! गाइलीं त्वां न गाणीं; २

कोणालाही परि विसरला तो न देवाधिदेव,
जो ब्रह्माण्डें करुण हृदयें पाळितोहे सदैव,
सर्वांतें या क्षितिवरि कुठें तत्कृपें लाधतात,
ज्ञाते भोक्ते चतुरहि किती चेतनाचेतनांत ! ३

---

## दिवे आणि आरसे.

कां हे आणितसां दिवे मजपुढें ? अंधार ज्यांच्या तळीं,
पापें जेथुन उद्भवून जगतीं आहेत बोकाळलीं,
कोठें न्याय वसे, कुठें करितसे अन्याय तो तांडव,
कोठें ज्ञान असे, नकोच मजला जाणीव याची लव ! १

हे आदर्श तुम्ही सदा मजपुढें कां ठेवितां आणुन ?
व्यापी विश्व असत्य उद्भवुनियां यांच्याच ओठांतुन !
माझें तोंड कसें, कपाळचि कसें, डोळेहि कैसे तसे,
सांगायास मला नकोत तुमचे हे मित्रहो ! आरसे ! २

# इशारत.

( अन्योक्ति. )

जरी स्वर्गीच्या चटक चांदण्यांनीं
तुला रात्रीं खुलविलें कटाक्षांनीं,
तुझ्या मंजरिचे करुनि शर सदैव,
करी जगता जरि विद्ध कामदेव; १
जरी आकारें असस्रि तूं विशाल,
रसिक तूतें जरि बोलती रसाल,
जरी ताफे तुजवरी कोकिलांचे
बसुनि घेती आलाप गायनाचे, २
नव्या लज्जेचें वस्त्र नवें ल्याली,
नवी तरुणी वल्लभें चुंबियेली,
तिच्या तेव्हां जी जन्मली कपोलीं
तीच खेळे तव फलीं जरी लाली; ३
नको आम्रा ! तरि करूं तिरस्कार
गरिब फणसाचा असा बेसुमार !
तिन्ही लोकीं सत्कीर्ति तुझी गाजे,
तुला चतुरा ! अविचार हा न साजे ! ४
कृती थोडी, वाचाळपणा फार,
असे याचा फणसास तिरस्कार !
फळें पुष्पांविण येति तया जाण !
करीं यावरुनी काय तें विधान ! ५
सत्य कथितों तुज, रोष मनीं नाणीं;
जरी फणसावरि कवि न गाइ गाणीं,
जरी तत्फल धरि वरुनि कंटकांला,
आंत तुजहुनि तरि माधुरी तयाला ! ! ६

## प्रथम दर्शन.

तोंच ये निकट एक कुमारी,
इंदु-सुंदर-मुखी सुकुमारी !
पद्मपत्रसम राजस डोळे,
मुक्त, वक्र, मृदु, कुंतल काळे ! १

हास्य लास्य करि नाजुक गालीं,
बुद्धिमत्त्वहि विशाल कपालीं !
लोहितोष्ठयुग विद्रुम-रम्य,
दाविती रदन मौक्तिक-साम्य ! २

मूर्ति पाहुनि तिची अभिराम,
नेत्र घेति मम तेथ विराम;
लोचनांप्रति जशी रमणीय,
मानसासहि गमे कमनीय ! ३

देखिल्या कितिक सुंदर बाला,
मोहसंभव न मन्मनिं झाला;
तोच पाहुनि हिला परि होई !
केविं ? हें नवल तों मजलाही ! ४

कार्यमात्र, नच कारण ठावें !
कां घनावलिस मोर भुलावे ?
अंबरीं उदय जों शशि पावे,
कां सरीं कुमुदवृन्द फुलावे ? ५

अन्य वृक्ष कितिएक विशाल,
यत्फलें रुचिर आणि रसाल,
तूंच मात्र परि एक रसाला !
केविं सांग रुचलास पिकाला ? ६

# कला तव कळुनि मला ये पुरी !

सहज तुझा मज अंत न लागो म्हणुनी मजला किती
दाविसी लीला लीलावति !
निजहास्याची चमक दावुनी करिसि मला आंधळा
आपुल्या लपवाया अश्रुला !
जीं जिव्हाग्रीं तव येउनियां बैसती,
बाहेर पडाया उत्सुक होउनि अति,
त्या प्रीतिवचांना कोंडुनि ठेविसी साति !
लपंडाव हे व्यर्थ परी तूं चालविसी सुंदरि,
कला तव कळुनि मला ये पुरी ! १
करिन अवज्ञा दाट परिचयें भीति अशी वाटुनी
टाळिसी बहुधा मज मानिनि !
गर्दीमध्यें भलतिच तुजला गणीन म्हणुनी गडे !
उभी तूं राहसि एकीकडे !
ज्या मार्गें जाया उत्कंठित तव मन,
दे आशा जेथें मृदु पुष्पें पसरुन,
तो बळेंच दिधला मार्ग तुवां सोडुन !
लपंडाव हे व्यर्थ परी तूं चालविसी सुंदरि,
कला तव कळुनि मला ये पुरी ! २
अधिक मजवरी हक्क आपुला समजसि इतरांहुनी
बैससी स्तब्ध म्हणुनि भामिनि !
सहज अनास्था दावुनि माझ्या सकल देणग्या सये !
टाळिसी घ्यायाचें तूं स्वयें !
जें स्वीकाराया चित्त तुझें आतुर,
व्हावया झटे तव दृष्टि स्थिर ज्यावर,
तें दूर लोटिसी असतांही प्रियतर !
लपंडाव हे व्यर्थ परी तूं चालविसी सुंदरि,
कला तव कळुनि मला ये पुरी ! ३

## याचना !

प्रिये ! याञ्चा तव दीन याचकाचीः—
पुरे मदिरा ही मधुर चुंबनांची !
तुझी मोहकता बद्ध मज करीते,
तिच्या तोडुनि बंधांस सोड मातें ! १

उदीचा हा पसरला दाट धूर,
जीव तेणें घाबरा होय फार !
उघड दारें तीं, आंत घे प्रकाश
उषेचा, जो चैतन्य दे जगास. २

किती लीलावति ! गोड तुझ्या लीला,
किती मोहक फेंकिसी कटाक्षांला !
करुनि मार्गच्युत कधिंच या जनासी
लाडिगोडी आणखीं चालवीसी ! ! ३

दूर करुनी आपुलें इंद्रजाल,
मुक्त निजदासा करीं एक वेळ !
कुठुनि नातरि तुजलागिं अर्पिण्याला
हृदय मालकिचें लाधणें तयाला ? ४

## एकच घोट !

तर हृदयें आतां होउंदेत सँलग्न,
राहुंदे गडे ! दृष्टींत दृष्टि गुंतून !
लुसलुशित आपुले लपवितेस कां ओठ ?
घेउंदे त्यांतल्या एक सुधेचा घोट !
मृत्युशीं कराया समर चाललों आज,
सोडिना अझुनि तरि तुजसि लाजरे ! लाज !
होईन अमर मी अधरसुधा तव पिउनी,
जाईन जवें मग मृत्युवरी चालोनी !
जो प्रेमाचें तव दिव्य कवच हें ल्याला,
वद विद्ध केविं त्या करिल मृत्युचा भाला ?
संगरीं शत्रुला क्षणार्धांत जिंकून,
आणीन सखे ! तव चरणाशीं बांधून !
सोडणें उचित लज्जेस—जर नसे,
तर खुशाल लाजत हांस—हें हंसें !
परि झांकुं नको वदनास —राजसे !
विजयाचा तुजवरि चढविन शाश्वत साज,
मज पाज एक तरि घोट सुधेचा पाज !

## पारिजातकाच्या कळया !

तीः—

मुक्तावली धवल, विद्रुमवल्लि रक्त,
हेलावतां उदधि होउनियां विमुक्त,
येतांच भूमिवरतीं बनल्या तयांच्या
या पारिजातक-कळया रमणीय साच्या !

तोः—

स्वप्नीं दिसे मजसि मूर्ति तुझी वियोगीं,
ती पावली विलय तूं दिसतांच वेगीं !
झाल्या तदोष्ठ-रद-हास्य-मृदुत्व यांच्या
या पारिजातक-कळया रमणीय साच्या ! २

---

## करो हें माझेंही अमरचि तसें गान तुजला !

करें एका तूतें करुनि कमलाक्षी ! जवळ मी,
तुला वक्षीं जेव्हां दृढ कवळियेली घन तमीं,
तमा त्वन्मुग्धत्वासह पळवुनी तों प्रकटला,
मणी त्वां लाजोनी हृदयिं अपुल्या जो लपविला ! १
तयाच्या जी तेजीं रुचिर तव मूर्ती विलसली,
जिच्या लावण्याला तृषित नयनें पीत बसलीं,
ठसा त्या मूर्तीचा मम हृदयिं जो या उमटला
पुसाया काळाचा करहि सखये ! त्या न शकला ! २
सुधा ओष्ठींची मी तव करुनियां सेवन तदा
गडे गातों आतां तुजवरुनि हें गायन सदा !
तुझ्या बिंबोष्ठींचें अमर करि पीयूष मजला,
करो हें माझेंही अमरचि तसें गान तुजला ! ३

---

# तैसाच निघोनी जाई !

दिवसानुदिवस तो येई—तैसाच निघोनी जाई !
जा सखे ! एवढें त्याला—हें वेणींतिल सुम देईं !
“ तुजशीं हें दिधलें कोणीं ? ”
तो पुसेल तुजलागोनी;
तरि तया-( विनति तव चरणीं )—
नांव न मम कळवीं बाई !
कारण तो येउनि मात्र—तैसाच निघोनी जाई ! १

येउनियां वृक्षाखालीं—बसतो तो धूलीमाजी !
पसरुनी ठेव तर तेथें—मृदु पल्लव पुष्पें ताजीं !
अश्रुपूर्ण त्याचे नयन
करितात मन्मना खिन्न !
तो दाखवी न बोलून—
हृदयीं जें घोळत राही !
सखये ! तो येउनि मात्र—तैसाच निघोनी जाई ! २

## कसा कुसुमा त्या तनुस्पर्श व्हावा ?

तिचे स्वकरीं घेवोनि हात दोन्ही,
तिला हृदयाशीं ठेवितों धरोनी !
तिची मोहकता बद्ध बाहुपाशीं—
करिन, मजलागीं हांव मनीं ऐशी ! १
तिचें मधुरस्मित लुटिन चुंबनांनीं,
नयनलीलामृत पिइन लोचनांनीं,
म्हणुनि झटतों; परि लाभ नच कशाचा !
कसा काढावा नीलिमा नभाचा ? २
तिच्या लावण्या कवळण्या पहावें,
तोंच त्यानें चुकवुनी मला जावें !
करीं माझ्या वपु मात्र तिचें यावें !
म्हणुनि कंटाळुनि परत म्यां फिरावें ! ३

* * * *

स्पर्श आत्म्यानें मात्र ज्या करावा,
कसा कुसुमा त्या तनुस्पर्श व्हावा ? ४

---

## संपवीन अपुलें गाणें !

इच्छाच तुझी जर असली—संपवीन अपुलें गाणें !
तव चित्तवृत्ति बावरते—तर नको तुजकडे बघणें !
तूं दचकुं नको मज बघुनी—चाललों अन्य मार्गानें !
जर उडे तुझा घोंटाळा,
त्यजिलें तव उद्यानाला !
गुंफ तूं सुखें सुममाला !
या पुढें न माझें येणें !
इच्छाच तुझी जर असली—संपवीन अपुलें गाणें ! १

---

## बरें तर ! संपीव !!

संपीव एकदां तर हें—शेवटलें अपुलें गाणें !
सोडुनी एकमेकांला—संप्राप्त आपणा जाणें !
गेलियावरी ही रजनी,
तिज नको आठवूं स्वमनीं !
जा तिला पार विसरोनी !!
अन्यथा न आतां होणें,
संपीव एकदां तर हें—शेवटलें अपुलें गाणें ! १

निज बाहूंनीं कवळाया—कोणाला झटतें मी ही !!
स्वप्नांस ठेवणें धरुनी—केंव्हांहि शक्य हें नाहीं !
रिक्तता उरीं धरितात
अति उत्सुक माझे हात !
भेदित तीं हृदया नेत !
त्या जखमा भरुनि न येणें !
संपीव एकद। तर हें—शेवटलें अपुलें गाणें ! २

# समुद्र आणि कवि.

ज्यांचा रंग करी विमोहित मना, शिंपा अशा सुंदर
लाटांनीं सहजीं दिल्या उडवुनी अंभोधितीरावर;
साना बाळ कुणी तयां उचलितां आनंदतो अंतरीं,
ये भांडारचि त्याजला गमतसे रत्नाकराचें करीं !! १

*　*　*　*

ज्यांची जादु करी विमोहित मना, गाणीं अशीं सुंदर
स्फूर्तीनें कविच्या दिलीं उडवुनी या बाह्य सृष्टीवर;
कोणी मानव त्यांप्रती उचलितां आनंदतो अंतरीं,
ये भांडाराचि त्याजला गमतसे काव्याकराचें करीं !! २

---

१ कवीचें.

## उपसंहार.

चिरंजीव कु. **अंबुबाई जोशी** हीसः—

खेळाचा अपुल्या आंवरिलास पसारा,
तूं त्यजुनी संध्ये ! स्वभाव हंसरा सारा !
तव वृत्ति विचारी एकाएकीं झाली !
ही छटा मुखावर गांभीर्याची आली !
संकोच दृष्टिचा सारा-लोपला !
पुढतिं हा अनंत पसारा-पातला !
हास्या न म्हणुनि का थारा-राहिला ?
होणार तुझ्या जर हास्याचा लय येथें,
तव हास्यासह तर मावळोत मद्गीतें ! !

तुझा—
"काका"

REFBK-0019490
REFBK-0019490
१६८१०